**– सत्र खटला क्र.१३/२०२१ मधील नि.क्र.१५५ वरील आदेश –**

(घोषित दि. ३०/०७/२०२४)

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र .२१ जावेद रशिद शेख यांनी त्यांना परदेशात जाण्यासाठी पुढील १० वर्षाकरिता पासपोर्ट क्र. Y6472890 चे नुतनीकरण करुन देणेबाबत दाखल केलेला आहे.

२. आरोपी यांचे असे म्हणणे आहे की , आरोपी हे जन्माने भारतीय आहेत , ते त्यांच्या कुटुंबासोबत कायमस्वरुपी गांव मौजे कणकवली , बाजारपेठ, ता.कणकवली , जि.सिंधुदुर्ग येथे राहतात. तसेच गांव मौजे कणकवली येथे त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम, ३५३,३३२, ३४२,३२४, १४७,१४३, १४८, १४९, ३२३, ५०४,५०६,१०९,१२०–बी, तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल असून त्याबाबतचा खटला या न्यायालयात प्रलंबित आहे. सदर खटला राजकीय वैमनस्यातून दाखल झालेला असून या घटनेशी आरोपी क्र .२१ चा वैयक्तिकरित्या कोणताही संबंध नाही, केवळ राजकीय पक्षाचे कार्यकर्ते म्हणून त्यांना यामध्ये गोवण्यात आलेले आहे. आरोपी हे बाजारपेठ, कणकवली येथील कायमचे रहिवाशी असून गेली बरीच वर्षे ते सदर ठिकाणी व्यवसायानिमित्त स्थायिक झालेले आहेत.

३. आरोपी/अर्जदार यांचे पुढे असेही कथन आहे की ,आरोपी क्र.२१ हे पासपोर्टचे आधारे परदेशात गेले तरी प्रस्तुत खटल्याचे कामकाजमध्ये कोणत्याही स्वरुपाचा खंड पडणार नाही याची दक्षता ते घेण्यास तयार आहेत. तसेच मे. न्यायालयाच्या परवानगी नंतर पासपोर्ट नं . Y6472890 चे नुतनीकरण मिळाल्यास त्याचा आरोपी/अर्जदार हे दुरुपयोग करणार नाहीत वा कोठेही पळून जाणार नाहीत. आरोपी/अर्जदार यांना पर्यटन निमित्त परदेशात जाणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुत खटल्याचे कामी त्यांची आवश्यकता असेल त्यावेळेस ते

न्यायालयात हजर राहण्यास तयार आहेत. , तरी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येवून पुढील १० वर्षाकरिता पासपोर्ट नं. Y6472890 चे नुतनीकरण करुन देणेस डेप्युटी पासपोर्ट ऑफीसर, रिजनल पासपोर्ट ऑफीसर, मुंबई यांना आदेश होणेबाबत त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर विशेष सरकारी अभियोक्ता यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन आरोपीला आवश्यक त्या अटी व शर्ती घालून अर्ज मंजूर करणेत यावा असे म्हटले आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही बाजूंकडून त्यांच्या कथनानुरुप युक्तिवाद केलेला असल्याने तो येथे उध्दृत करणेत आलेला नाही . प्रस्तुत अर्जातून अर्जदार हे असलेल्या पासपोर्टचे केवळ नुतनीकरण करुन मागत आहेत. सदरचा खटला हा औपचारिक चौकशी कामी प्रलंबित आहे . तसेच सदर खटल्याच्या कामकाजात आरोपीच्या अनुपस्थितीमुळे विलंब होणार नसल्यास, केवळ खटला प्रलंबित असल्याच्या कारणावरुन अर्ज नाकारणे संयुक्तिक नाही. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## – आदेश –

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. आरोपी क्र.२१ श्री.जावेद रशिद शेख यांचा पासपोर्ट क्र. Y6472890 चे नुतनीकरण करणेस परवानगी देण्यात येत आहे.

JOSHI SANIKA SATISH

Digitally signed by JOSHI SANIKA SATISH
Date: 2024.08.07 17:52:25 +0530

दिनांक –३०/०७/२०२४
सिंधुदुर्ग – ओरोस.

(श्रीमती सानिका एस.जोशी)
सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग ओरोस.